महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१०/४३०/४६५,
ई-मेल–desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १०/एनजीपी/पदविका/SOP/२०२१/ ४७७ दिनांक : 25 JUN 2021

प्रति,
प्राचार्य/संचालक/समन्वयक,
पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे सुविधा केंद्र

**विषय —** कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर सुविधा केंद्रांवर करावयाच्या उपाययोजना.

**संदर्भ :** का.आ. क्र. १०/एडीएम/सुविधा केंद्र/पोस्ट एसएससी/२०२१/४७५ दि.२५.०६.२१

उपरोक्त संदर्भिय कार्यालयीन आदेशान्वये या कार्यालयाकडून पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सुविधा केंद्रे घोषित करण्यांत आलेली आहेत. तसेच घोषित करण्यांत आलेल्या सुविधा केंद्रावर वरील संदर्भिय पत्रांमध्ये नमूद केल्यानुसार संपूर्ण पायाभूत सुविधा (Infrastructure) तयार ठेवण्यासाठी सुद्धा सूचित करण्यांत आलेले आहे. त्याअनुषंगाने कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सुविधा केंद्रावरील अधिकारी/कर्मचारी, पालक व विद्यार्थी यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून करण्यात यावयाच्या उपाययोजना आणि त्याअनुषंगिक इतर सविस्तर सूचना (SOP) या पत्रासोबत देण्यात येत आहेत.

संस्थेतील अधिकारी/कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सदर सूचना दर्शनी भागात प्रदर्शित करण्यात याव्यात.

तसेच आपले केंद्र जरी सुविधा केंद्र म्हणून घोषित केले असले तरी आपल्या संस्थेच्या परिसरातील स्थानिक प्रशासनाकडून लॉकडाऊन अथवा संस्थेचा परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले असल्यास सदर सुविधा केंद्र कार्यान्वित राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कोविड-१९ च्या प्रादूर्भावामुळे सुविधा केंद्रावर सोबतच्या सूचनांनुसार उपाययोजना करणे बंधनकारक असून याबाबत काही समस्या उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संस्था प्रमुखांची राहिल.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत —सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे.

आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सुविधा केंद्रांवर सोबत जोडलेल्या सूचना (SOP) नुसार आवश्यक उपाययोजना होत असल्याची खात्री करण्यांत यावी. तसेच ज्या सुविधा केंद्राच्या परिसरात लॉकडाऊन अथवा परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले असल्यास सदर सुविधा केंद्र कार्यान्वित राहणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. सदर सूचनांच्या अंमलबजावणीबाबतची संपूर्ण जबाबदारी आपली राहिल.

*E/Bhadekar/Letter*

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

दि.२४/०६/२०२१

## पदविका अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०२१-२२ साठी स्थापित केलेल्या सुविधा केंद्रांवर (Facilitation Centre ) कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर खबरदारी घेण्यासंदर्भात प्रमाणित कार्यपद्धती [SOP]

१. सर्व सुविधा केंद्रांनी सदर कार्यपद्धती , राज्य / केंद्र शासनाने कोविड -१९ संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेली मार्गदर्शक तत्वे , विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी / स्थानिक प्रशासन यांनी कोविड -१९ संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/ यांचे कटाक्षाने पालन करणे आवश्यक आहे. याअनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या सर्व सूचनांचे अनुपालन करण्याची जबाबदारी संबंधित केंद्र असलेल्या संस्था प्रमुखाची असेल.

२. वरील १ च्या अनुषंगाने अनुपालन करण्याची जबाबदारी संबंधित सुविधा केंद्र असलेल्या संस्थाप्रमुखाची राहील.

३. सुविधा केंद्र कार्यरत असलेल्या संस्थेत काम करणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी मास्क लावणे आवश्यक आहे.

४. सुविधा केंद्र कार्यरत असलेल्या संस्थेत काम करणाऱ्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी सॅनिटायझर / हात स्वच्छ धुण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे.

५. सुविधा केंद्र कार्यरत असलेल्या संस्थेस प्रवेशाचे कामासंदर्भात भेट देणाऱ्या अर्जदार / पालक यांनी मास्क परिधान करणे आवश्यक आहे, अशा सूचना त्यांना प्रवेशद्वारावरच लावून याबाबतचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील.

६. सुविधा केंद्र कार्यरत असलेल्या संस्थेच्या प्रवेशद्वारावरच स्पर्शविरहित थर्मोमीटर आणि ऑक्झिमीटर द्वारे अभ्यागतांची/विद्यार्थ्यांची तसेच संस्थेतील कार्यरत अधिकाऱ्याची/कर्मचाऱ्यांची तपासणी बंधनकारक असेल.

७. सुविधा केंद्रास प्रवेशाचे कामासंदर्भात भेट देणारे अभ्यागत / विद्यार्थी यांचे वापरासाठी निश्चित केलेले पॅसेज, प्रसाधनगृहे , लिफ्ट, चौकशी काउंटर, संगणके व इतर सर्व संसाधने इत्यादींचे रोज साधारणतः दोन तासाचे अंतराने निर्जंतुकीकरण आवश्यक असेल.

८. सुविधा केंद्रास भेट देणारे विद्यार्थी /पालक यांचे कडून सामाजिक अंतर राखण्याच्या नियमांचे पालन व्हावे या दृष्टीने रांगेचे व्यवस्थापन, पुरेसे अंतर ( ६ feet ) ठेवून रांगेत उभे राहण्यासाठी वर्तुळ आखणी या तरतुदी संबंधित संस्थेने कराव्यात .

९. गर्दी टाळण्याच्या दृष्टीने विद्यार्थी / पालक यांचे साठी पुरेश्या प्रमाणात मार्गदर्शनासाठी दिशादर्शक (Signबोर्डस / पोस्टर्स ) असावेत.

१०.संबंधित ठिकाणच्या स्थानिक प्रशासन / जिल्हाधिकारी यांनी जर एखाद्या सुविधा केंद्राचा परिसर कंटेनमेंट क्षेत्र घोषित केला असेल तर तेथील सुविधा केंद्रविषयक कामकाज तात्काळ बंद करण्यात यावे आणि रांगेतील विद्यार्थ्यांची अर्ज भरण्यासासंबंधी अपूर्ण राहिलेली कार्यवाही संबंधित विभागीय सहसंचालक यांचे निर्देशानुसार पूर्ण करण्यात यावी.

११.विभागीय कार्यालयाने याबाबत संचालनालयास तात्काळ अवगत करून वरील (१०) येथे नमूद सुविधा केंद्राचे कामकाज (Slot Booking इत्यादी ) इतर सुविधा केंद्रावर हस्तांतरित करावे.

१२.वरील प्रमाणे सुरक्षेच्या सर्व उपाययोजनांचे पालन सर्व सुविधा केंद्राकडून होते किंवा नाही याची विभागीय कार्यालयाने खातरजमा करावी. जर एखाद्या सुविधा केंद्रावर वरील प्रमाणे सुरक्षेचे उपाय योजलेले नाहीत किंवा संबंधीत यंत्रणांनी निर्गमित केलेले निर्देश / मार्गदर्शक तत्वे यांचे अनुपालन होत नाही असे विभागीय कार्यालयाच्या अथवा त्यांचे प्रतिनिधींचे लक्षात आल्यास तेथील सुविधा केंद्रविषयक कामकाज तात्काळ स्थगित करण्यात यावे आणि याबाबत संचालनालयास अवगत करुन संचालनालयाचे निर्देशानुसार पुढील कार्यवाही करावी.

१३.कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर कोणत्याही परिस्थितीत गर्दी होणार नाही याद्दष्टीने सुविधा केंद्र हे साधन सामग्रीने व सुविधांनी सुसज्ज राहील तसेच तेथील अधिकारी/कर्मचारी वर्ग पुरेशा प्रमाणात राहील याची खातरजमा करण्याची जबाबदारी सुविधा केंद्र असलेल्या संस्था प्रमुखाची राहील.

*****x******